# कार्यालय नागपूर ,महानगरपालिका नागपूर
## ( शिक्षण विभाग )

शिक्षण विभाग (माध्यमिक)
म.न.पा.केंद्रीय कार्यालय
सिव्हील लाईन्स,नागपूर-01

दुरध्वनी क्रमांक 0712-2569933, 2567028
E-mail Id- education.nmc@gmail.com

जा.क्र. 138 दि. 20.2.2015

प्रति,

मुख्याध्यापक,
म.न.पा. सर्व माध्यमिक शाळा.

विषय :- निम्न श्रेणी शिक्षक संवर्गात नियुक्त झालेल्या मात्र सेवेत असतांना कार्यालयीन परवानगीने उच्च शैक्षणिक पात्रता धारण केल्याने प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी प्राप्त शिक्षकांचे पूर्वलक्षी प्रभावाने बी.एड्. उत्तीर्ण झाल्याने वर्षापासुन सदर वेतनश्रेणी मिळण्याबाबत कार्यालयास प्राप्त अर्जाचे अनुषंगाने असे प्रस्ताव सादर करण्याबाबत.

विषयाचे अनुषंगाने सुचित करण्यात येते की, विषयांकीत बाबीस्तव काही शिक्षकांचे अर्ज/नस्ती कार्यालयास प्राप्त झालेल्या आहे. असे अर्ज पुन्हा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे झाल्यास एकाच प्रकारचे प्रस्ताव वारंवार तयार करावे लागतील. सबब अशा प्रकरणी आपणास सूचित करण्यात येते की, आपण आपल्या शाळेतील शिक्षकांना सूचना देऊन विषयाचे संबंधाने त्यांना अर्ज करावयाचे असतील तर त्यांचे अर्ज शाळेमध्ये स्विकारण्यात यावे. अर्जासोबत सर्वप्रथम वेतनश्रेणीची मागणी केलेल्या अर्जाच्या सत्यप्रत ,पूर्वीची कार्यालयीन टिप्पणी ,शासन निर्णय, तत्कालिन संच मान्यता/मान्य पदे ,रिक्त पदांचा गोषवार ,संबंधीत शिक्षकाने उच्च वर्गांना केलेल्या अध्यापनाचा पुरावा,उच्च शैक्षणिक पात्रता / परिक्षेस बसण्याची कार्यालयीन परवानगी इत्यादी सत्यप्रत संबंधीत शिक्षकाकडून प्राप्त करुन मुख्याध्यापकांनी स्वत:चे अभिमत/ कार्यालयीन टीपणीसह प्रस्ताव सादर करावा. एका शाळेत एकापेक्षा जास्त शिक्षक असल्यास एकाच नस्तीत /टीपणीत मुख्याध्यापकांनी प्रस्ताव द्यावा. संपुर्ण तयार नस्ती दिनांक २३.०३.२०१५ ते २४.०३.२०१५ या कालावधीत शिक्षण विभागास सादर करावी. या कालावधीपूर्वी किंवा त्यानंतर प्रस्ताव स्विकारल्या जाणार नाही. तसेच याबद्दल शाळेतील सर्व शिक्षकांना सूचना देण्यात यावी. शिक्षकांमार्फत आलेली स्वतंत्र नस्ती कार्यालयास स्विकारण्यास येणार नाही.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर